# महात्मा गांधी : शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय विचार

**सहा. प्रा. सचिन सोमगोंडा पाटील,** वाणिज्य विभागप्रमुख कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज.

**कुमारी प्रतीक्षा पुंडलिक दुंडगे** (B. Com. I ) कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज.

---

**सारांश :-**

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात म.गांधी यांचे योगदान हे अत्यंत महत्त्वपूर्ण व मोलाचे आहे . 1920 नंतर भारतीय लढ्याचे नेतृत्व महात्मा गांधी यांच्याकडे आले. भारतीय स्वातंत्र्याचा लढा महात्मा गांधी यांच्या कार्यभोवती केंद्रित झाला. महात्मा गांधी यांचे नाव जगभर पसरलेले आपल्याला दिसून येते त्याचे कारण म्हणजे त्यांनी भारताच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्याचा उमटवलेला ठसा होय .महात्मा गांधी हे स्वातंत्र्ययोद्धा, समाजसुधारक, शिक्षणतज्ञ, राजकीय विचारवंत, अस्पृश्यांची उद्धारक, धर्मवक्ते ,अर्थतज्ञ म्हणूनही ओळखले जातात .

**प्रस्तावना -**

ब्रिटिशांविरुद्ध दिलेला मानवी लढा हा भारतीय समाजाच्या बदलाला कारणीभूत ठरला तो लढा महात्मा गांधी यांनी दिला. याविषयी 'निर्मलकुमार फडकुले म्हणतात की, भारतीय राजकारणात गांधीजींचा अवतार झाला नसता तर सशस्त्र क्रांतीच्या मार्गाकडे तरुण वळले असते यात शंकाच नाही'

. सत्य आणि अहिंसा या तत्त्वाच्या आधारे भारतीय स्वातंत्र्याचा लढा चालविणारे महात्मा गांधीजी पहिले क्रांतिकारी व्यक्तिमत्व होते. याविषयी 'विनोबा भावे म्हणतात की, भगवान बुद्धानंतर सत्य, अहिंसेचा एवढा मोठा पुजारी दुसरा झालाच नाही. म्हणजेच गौतम बुद्ध यांची सत्य आणि अहिंसा या तत्त्वाची प्रेरणा घेऊन महात्मा गांधीजींनी भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. महात्मा गांधी यांच्यावर थोरो, रस्किन यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. त्याचबरोबर गांधीजींचे शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय विचार हे आजच्या काळातील समाज व्यवस्थेला आदर्श ठरतात.

**उद्दिष्टे : -**

1. महात्मा गांधी यांच्या शिक्षण विषयक विचारांचा अभ्यास करणे.
2. महात्मा गांधी यांच्या शिक्षणाची उद्दिष्टे काय होती याचा अभ्यास करणे.
3. महात्मा गांधी यांच्या सामाजिक विचारांचा अभ्यास करणे.
4. महात्मा गांधी यांच्या राजकीय विचारांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती –**

महात्मा गांधी यांच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि आर्थिक विषयक विचार हा संशोधनपरलेख मांडताना सर्वसाधारणपणे दुय्यम पध्दतीचा अभ्यास केला आहे. सदरील माहितीचे संकलन मासिके, इंटरनेट, शोधनिबंध, इंटरनेटवर उपलब्ध गांधीजींचे चरित्र इत्यादींवर आधारित आहे.

**महात्मा गांधी व शिक्षण विचार-**

महात्मा गांधी यांनी वर्धा येथे झालेल्या शैक्षणिक परिषदेत आपले शैक्षणिक विचार मांडले दिसतात. महात्मा गांधी यांचे शिक्षण पद्धती ही 'वर्धा योजना' मूलदोगी शिक्षण , बुनीयादी शिक्षण व जीवन शिक्षण इत्यादी नावाने ओळखले जाते. शिक्षण विषयी गांधीजी म्हणतात की, 'मी शिक्षण क्षेत्रात अनाधिकारी व्यक्ती आहे व शिक्षणाचा जो रूढ व तांत्रिक अर्थ आहे त्यापासून मी अनविज्ञआहे. पण हा त्यांचा नम्रपणा होता कारण ते स्वतः म्हटले आहे मी भारताला अनेक प्रकारच्या गोष्टी दिल्या त्यात वर्धा शिक्षण योजना व शिक्षण पद्धती ही सर्वात महत्त्वाची आहे.' त्यांच्या शिक्षण विषयक तत्त्वज्ञानात निसर्गावाद, आधीवार्ध, वास्तववाद व कार्यवाह या चारही

तत्वांचा समन्वय झालेल्या दिसून येतो. गांधीजींनी समाजशिक्षण, प्रौढ शिक्षण, स्त्री व हरिजन शिक्षण, विद्यापीठ शिक्षण इत्यादी घटकात महत्त्वपूर्ण कार्य केलेले दिसते.

शिक्षण हे समाज बदलाचे एक महत्वपूर्ण साधन आहे. समाज जीवनाला नवी दिशा देण्याचे कार्य शिक्षणच करू शकते हा विचार गांधीजीं मांडताना दिसतात. आजच्या काळातही शिक्षण पद्धती ही वेगवेगळया क्षेत्रात जोर धरू लागली आहे. वर्तमान शिक्षण पद्धती महात्मा गांधींचे शैक्षणिक विचारात बीच रवलेली दिसतात. गांधीजींच्या मते शिक्षण हे फक्त पुस्तके शिक्षण नको तर शिक्षणामुळे बुद्धी, शरीर, हृदय या तिन्हीच्या समतोलाचा विकास साधता आला पाहिजे. म्हणजेच आजच्या वर्तमान शिक्षण प्रणालीचा ढासळलेला दर्जा हा महात्मा गांधींच्या शिक्षण विषयक विचाराने निश्चितच उंचावल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी गांधीजींच्या विचारांचा अवलंब करणे आजही आवश्यक ठरते.

**महात्मा गांधीजींचे सामाजिक विचार-**

सर्वच धर्मांनी अहिंसा एक महत्त्वाचे मूल्य मांडले आहे. परंतु महात्मा गांधींनी या मूल्याला सामाजिक व राजकीय परिणाम दिले .व्यक्तिगत जीवनाप्रमाणेच सामाजिक व राजकीय जीवनात सत्यशोधनाचा, सत्य प्रस्थापित करण्याचा एकमेव मार्ग म्हणून त्यांनी अहिंसेचा पुरस्कार केला. गांधींनी कोणत्याही व्यक्तीस शारीरिक किंवा मानसिक इजा न पोहोचवणे म्हणजे नकारात्मक अहिंसा तर प्रतिपक्षावर विरोधकांवर किंवा शत्रूंवर प्रेम करणे म्हणजे भावनात्मक अहिंसा असे दोन प्रकार सांगितले. त्यांची अहिंसेच्या व्यापक संकल्पना होती. दुसऱ्याची वाईट चिंतने, शत्रुत्वाची भावना बाळगणे यामुळे अहिंसेच्या तत्त्वाला बाधा निर्माण होते असे त्यांचे म्हणणे होते. अहिंसक होण्यासाठी आत्मशक्ती, सत्तेचे आकांक्षा नको, अहंकार व असत्यही नको, विनम्रता आणि धारिष्टाची आवश्यकता असते.

गांधीवादातील राम राज्य म्हणजे ज्या राज्यात व्यक्ती स्वातंत्र्य हे सर्वोच्च मूल्य मानले जाते असे विकेंद्रीत लोकशाही व्यवस्था असलेले राज्य होय. ज्या राज्यात उच्च-नीचता नसेल गरीब श्रीमंत, स्त्री-पुरुष असा भेद नसेल, वंश आणि पंथ यावरून भेदभाव केला जात नसेल ते राम राज्य होय. गांधीजींच्या या राम राज्यात समृद्ध, सुखी आणि स्वयंपूर्ण गावे असतील.

रामराज्याप्रमाणे महात्मा गांधीजींच्या विचारात ग्रामस्वराज्याची कल्पनाही महत्त्वाची मानली होती. स्वयंपूर्ण स्वयंशासित खेडेगावांचा संघ म्हणजे राज्य अशी गांधीजींची राज्य संकल्पना होती. यंत्र युगाने खेड्यातील साधे, सरळ जीवन संपुष्टात आणले. माणसाचे जीवन यांत्रिक बनले. त्यामुळे खेड्यांना पूर्वीप्रमाणे स्वायत्तता प्राप्त करून देण्याची कल्पना उदयाला आली. औद्योगिक क्रांतीनंतर शहरीकरण वाढले, आर्थिक विषमता वाढली आणि भाकस जीवन असणारी खेडी असे चित्र देशात निर्माण झाले. खेड्यातील लोकांचे दारिद्र्य अधिकच वाढले. आर्थिक सत्तेचे आणि राजकीय सत्तेचे केंद्रीकरण वाढले. गावातील कामेही प्रांतिक आणि मध्यवर्ती शासनातर्फे होऊ लागली. ग्रामीण भागातील जनतेचे स्वातंत्र्य उपक्रमशीलता संपुष्टात आली. अशा परिस्थितीत महात्मा गांधींनी ग्रामस्वराज्याची कल्पना मांडली ही कल्पना प्रामुख्याने विकेंद्रीकरण आणि स्वयंपूर्ण खेडे यावर आधारलेली होती. महात्मा गांधीजींच्या मते प्रत्येक खेड्यांने आपला कारभार स्वतःच करावा. मध्यवर्ती शासनाचे त्यावर कमीत कमी नियंत्रण असावे. खेड्यातील लोकांच्या परस्पर सहकार्याने सर्वांच्या गरजा भागाव्यात. त्यामुळे शोषण संपेल. खरे स्वातंत्र्य, समता आणि बंधुता निर्माण होईल हा आशावाद ग्रामस्वराज्याच्या कल्पने मागे होता.

प्राचीन धर्मांनी मनुष्याला 'माणूस'बनवण्याचा प्रयत्न केला आकाशाकडे दृष्टी लावून गांधींनी ती दृष्टी धरतीकडे वळवली. मनुष्याची सार्थ बुद्धी स्वाभाविक असली तरी या बंदिस्त घराला सामाजिक धर्म बुद्धीच्या रूपाने खिडक्या दारे हवीच, तरच हवा आणि प्रकाश आत येतील, हे सामान्य माणसाला त्यांनी पुन्हा पुन्हा पटविले. भारताच्या भावी पिढ्यांना त्यांनी दिलेली ही सर्वात मोठी देणगी आहे. त्यांचा संदेश एकच आहे- "अंतरीचा प्रेम दिवा मालवू नको रे!''गांधीजींनी दिलेल्या प्रकाशात आजच्या दाटलेल्या अंधारातून भारतीय मनाला आणि जीवनाला सुख शांतीचा मार्ग दाखविला.

**महात्मा गांधीजींचे राजकीय विचार-**

गांधीजी अहिंसक मार्गाचा वापर अन्याय शासनाविरुद्ध देशांतर्गत दंग्याझोप्यांच्या व दंगलीच्या प्रसंगी, परकीय आक्रमणाविरुद्ध आणि स्वतःच्या कुटुंबात, संस्थेत महासंघटनेत करणे शक्य आहे. असे सांगतात ते त्यांनी प्रत्यक्षात वापरात आणून दाखविले. गांधींचा हिंसेला नकार, युद्धाला नकार देऊनअहिंसात्मक मार्गाने जागतिक शांतता प्रस्थापित करण्याचे सांगतात. गांधींच्या विचारांच्या आधारावर 1960, 1970 च्या काळात जागतिक राजकारणात विशेषतः युरोपात आणि इतरत्र देशात अहिंसात्मक मार्गाची शांततामय चळवळ सुरू झालेले दिसते. आंतरराष्ट्रीय स्तरावर, शस्त्र- अस्त्र स्पर्धा वाढून हिंसात्मक वाढलेली दिसते.तसेच देशांतर्गत स्तरावर सुद्धा विशेषतः विकसनशील देशात नागरी समाजात, जाती, धर्माच्या आधारावरील राजकारणातील दंगली, वंशवादाच्या दंगली, वरचेवर वाढताना दिसतात. तसेच प्रदेश वाद, फुटीरवाद, दहशतवाद या प्रकारच्या हिंसात्मक प्रवृत्ती वाढल्याने जीवित हानीत वाढ झालेली दिसते, महानगरामध्ये अर्थ राजकारणामुळे खून, हिंसपात होताना दिसतात. अशा हिंसात्मक धामधुमीत मानवाला शांततामय सुखी जीवन जगता येणार नाही. गांधींच्या विचारानुसार मार्ग, चर्चा, मन परिवर्तन, प्रबोधन करून देशांतर्गत नागरी समाजातील दोष दूर करता येतो. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर हिंसपात, युद्ध रोकवायची असल्यास पंचशील तत्वे याचा वापर करून तसेच नाम [अलिप्तवादी चळवळ]चा वापर करून रोखता येतो.

**राजकीय आर्थिक सत्तेचे विचार-**

गांधींच्या आदर्श राज्यांचा मूळ आधार खेडे राहतील, प्रत्येक खेडे स्वावलंबी, स्वयंपूर्ण व स्वायत्त असेल या खेड्यात राजकीय- आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण राहिले. उत्पादन केंद्रित, सत्ता केंद्रित, राजकीय व्यवस्थेऐवजी मानव केंद्रित सत्तेसाठी- राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण आवश्यक आहे. गांधी विचारावर आधारित संविधान अनुच्छेद 40 मध्ये राजकीय सत्तेच्या केंद्रीकरणासाठी पंचायत राज व्यवस्थेची तरतूद केलेली असून 2 ऑक्टोबर 1959 मध्ये भारतात पंचायत राज व्यवस्थेची स्थापना ही करण्यात आली. पण पंचायतराजला स्थानिक स्तरावर निर्णय घेण्याचा अधिकार मात्र दिलेला नाही. म्हणून अण्णा हजारे यांनी ग्रामसभा ही संसद करण्यासाठी आंदोलन करत आहे. सरकारने गांधी विचारावर आधारित ग्रामस्वराज्यासाठी अनेक कायदे केलेले आहेत.गांधीजी राजकीय सत्तेच्या विकेंद्रीकरणाबरोबरच उपयुक्तवादी आधुनिक अर्थशास्त्राला नकार देऊन भांडवलशाहीच्या केंद्रित व्यवस्थेला विरोध करतात गांधींच्या समाज व्यवस्थेत प्रमुख स्थान शेतीला व शेतीशी पूरक ठरणाऱ्या लघुउद्योग ग्राम उद्योगाला आहे. गांधींच्या मते शेती ही सरकारी पद्धतीने व लहान प्रमाणात करून शेतीस पूरक ठरणाऱ्या ग्रामद्योगासारख्या हस्त व्यवसायांना प्राधान्य दिले पाहिजे. त्यामुळे खेडी आपल्या आवश्यक गरजा पूर्ती करतील. खेड्यातील लोकांना नोकरीसाठी इतरत्र जावे लागणार नाही व बेकारी नष्ट होईल आज शहरी भोग विलासी जीवनाचा लोकांना कंटाळा आलेला आहे. शहरी जीवनाचे अनेक समस्यांना जन्म दिले आहे. अशा समस्यांपासून सुखी समृद्धीचे जीवन हे खरे खेड्यातच आहे. म्हणून आता परत खेड्याकडे चला असे म्हणावे लागेल.

**निष्कर्ष-**

1. महात्मा गांधी यांची शिक्षण व्यवस्था व शैक्षणिक विचार आजच्या वर्तमान स्थितीत स्वीकारल्यास समाज परिवर्तन होण्यास मोठ्या प्रमाणात मदत होऊ शकते.

2. गांधीजींची शिक्षण प्रणाली ही व्यवसायभिमुख असल्याचे दिसून येते.

3. महात्मा गांधीजींचे राजसंस्थेविषयाचे विचार पाहिले असता मानव कल्याण व राष्ट्र उन्नती हा एकमेव दृष्टिकोन दिसून येतो.

**संदर्भ ग्रंथ-**

1. डॉ. अण्णासाहेब गरुड, डॉ. बी.बी. सावंत, महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास. कैलास प्रकाशन, औरंगाबाद.

2. सुमित सरकार, आधुनिक भारत का इतिहास, राजकमल प्रकाशन, दिल्ली.

3. सुहास कुलकर्णी, मिलिंद चापनेकर असा घडला भारत, रोहन प्रकाशन, पुणे.